# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः14.06.2024** **वारःशुक्रवार**

---

•नीटचे वाढीव गुण रद्द करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

•राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुनेत्रा पवार यांचा राज्यसभेवर बिनविरोध निवडून येण्याचा मार्ग मोकळा

•मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांचं उपोषण स्थगित आणि

•नागपूरजवळ फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या स्फोटात सहा जणांचा मृत्यू

नीट

वैद्यकीय पात्रता परीक्षा 'नीट'मध्ये वाढीव गुण मिळालेल्या सर्व १ हजार ६ शे ६३ विद्यार्थ्यांचे वाढीव गुण रद्द करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. या विद्यार्थ्यांना फेरपरीक्षा देण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला असल्याची माहिती सरकारने काल सर्वोच्च न्यायालयात दिली. २३ जून रोजी होणाऱ्या या फेरपरीक्षेचा निकाल ३० जून रोजी जाहीर करण्यात येईल. ज्या विद्यार्थ्यांना फेरपरीक्षा द्यायची नसेल त्यांचे वाढीव गुण वगळून मिळालेले गुण ग्राह्य धरण्यात येतील, असंही सरकारनं सांगितलं.

या परीक्षेत गैरप्रकार आणि पेपर फुटल्याच्या आरोपावरून सर्वोच्च  न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती, त्यावर काल सुनावणी झाली. या परीक्षेच्या प्रवेश प्रक्रियेतील समुपदेशनाला  स्थगित देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला.

नीटचा पेपर फुटल्याचा किंवा गैरप्रकार झाल्याचा आरोप केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी फेटाळून लावला आहे.

मोबाईलॲप

भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ आणि भारतीय साक्ष अधिनियम २०२३ हे तीन नवीन गुन्हेगारी कायदे येत्या १ जुलैपासून अमलात येणार आहेत. नागरिकांना या कायद्यांविषयीची सविस्तर माहिती जाणून घेता यावी यासाठी एनसीआरबी संकलन ऑफ क्रिमिनल लॉज हे मोबाईल ॲप सुरू करण्यात आलं आहे. प्ले स्टोअर अथवा ॲप स्टोअरच्या माध्यमातून हे ॲप डाउनलोड करता येईल.

मुरलीधरमोहोळ

विविध केंद्रीय मंत्र्यांनी काल आपला कार्यभार स्वीकारला. के. राममोहन नायडू यांनी नागरी विमान वाहतूक मंत्रालयाचा तर मुरलीधर मोहोळ यांनी नागरी विमान वाहतूक राज्य मंत्रीपदाचा पदभार स्वीकारला. देशात विमानतळांची संख्या वाढवणं, विमान प्रवास सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणणं आणि प्रवाशांच्या मुलभूत सुविधांवर लक्ष केंद्रित करण्यावर आपला भर असेल, असं  मोहोळ यांनी यावेळी सांगितलं.

सुनेत्रापवार

राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या राज्यसभेच्या एका जागेसाठी सुनेत्रा पवार यांनी काल मुंबईतील विधानभवनात, उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, पक्षाचे कार्याध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, मंत्री छगन भुजबळ आदी उपस्थित होते अर्ज भरण्याच्या कालच्या शेवटच्या दिवसापर्यंत पवार यांच्या शिवाय इतर कुणीही अर्ज भरलेला नाही. त्यामुळे सुनेत्रा पवार यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

पवार

राज्यात सध्या सुरू असलेली, प्रगतीपथावर असलेली आणि प्रस्तावित विकासकामं ठरलेल्या वेळेत गतीने पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. मंत्रालयात काल झालेल्या प्रकल्प सनियंत्रण कक्षाच्या बैठकीत दिले. पुणे मेट्रो क्रमांक तीनच्या कामाला वेग द्यावा. पुणे रिंग रोडचं कामंही गतीनं मार्गी लावावं अशा सूचना पवार यांनी दिल्या.

राज्यपाल

विकसित भारताचं ध्येय साकार करायचं असेल तर आगामी दहा वर्षात देशातल्या पहिल्या ५० विद्यापीठांमध्ये क्रमांक मिळवण्याचं ध्येय समोर ठेवून काम करा, असं आवाहन कुलपती आणि राज्यपाल रमेश बैस यांनी काल केलं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६४वा दीक्षांत समारंभ राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली, आणि 'एनसीएल'चे संचालक डॉ.अशिष लेले यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला; या सोहळ्यामध्ये राज्यपाल दूरस्थ माध्यमातून बोलत होते.

नियुक्ती

साताऱ्यातल्या डॉ. धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांची साताऱ्यातल्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यपाल आणि कुलपती रमेश बैस यांनी काल ही नियुक्ती केली. डॉ. ज्ञानदेव म्हस्के १९ वर्षांहून अधिक काळ प्राचार्य पदावर कार्यरत आहेत.

प्रतिभाधानोरकर

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात महाआघाडीच्या खासदार म्हणून निवडून आलेल्या प्रतिभा धानोरकर यांनी काल विधानसभा अध्यक्षांकडे आपला आमदार पदाचा राजीनामा सुपूर्द केला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी खासदार प्रतिभा धानोरकर यांना भावी राजकीय आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

जरांगे-उपोषणस्थगित

मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे यांनी गेल्या आठ जूनपासून, सुरू असलेलं उपोषण काल स्थगित केलं. मंत्री शंभुराज देसाई, खासदार संदीपान भुमरे, आमदार राणा रणजीतसिंह यांच्या शिष्टमंडळाने जरांगे यांची काल आंतरवाली सराटीत भेट घेतली. सगेसोयरे संदर्भातील आपली मागणी राज्य सरकारने मान्य करावी अशी भूमिका जरांगे यांनी घेतली होती. या संदर्भात सरकार एक महिन्यात निर्णय घेईल असं आश्वासन सरकारतर्फे देण्यात आल्यानंतर जरांगे यांनी उपोषण मागे घेतलं.

मिफ्फ

१८व्या मुंबई आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या पहिल्या दिवशी उद्या नॅशनल जिओग्राफीकचा 'बिली अँड मॉलि – ॲन ओटर लव्ह स्टोरी' हा माहितीपट प्रदर्शित करण्यात येणार आहे. दिल्ली, कोलकाता, चेन्नई आणि पुणे इथे एकाच वेळी हा माहितीपट प्रदर्शित करण्यात येणार आहे. या महोत्सवात यंदा २१ मराठी चित्रपट, लघुपट आणि माहितीपटांचा समावेश

आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सार्वनिक कौर यांचा अगेन्स्ट द टाइड हा चित्रपट आहे. तर राष्ट्रीय स्पर्धेत बिगारी कामगार, भैरवी, भगवान, गुंतता हृदय हे, वूमन ऑफ बिलियन, फेरा, आजोबांचं घर, वैद्यराज, अद्वैताच्या पाऊलखुणा, सहस्त्रसूर्य सावरकर, डोमकावळा - द रावन, भेड चाल, म्हातारा डोंगर हे लघुपट-माहितीपट पाहता येतील. विविध विद्यार्थ्यांचे ७ मराठी लघुपट, माहितीपटही या महोत्सवात आहेत.

शेगांव

शेगांवच्या संत गजानन महाराजांच्या पालखीने आषाढी वारीसाठी काल सकाळी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलं. केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी पालखीमध्ये सहभागी होत, पालखी सोहोळ्यातील वारकऱ्यांशी संवाद साधला.

एसटी

एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या विनंती बदल्या यापुढे संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून ऑनलाईन होणार आहेत. त्यामुळे बदल्यांबाबतचे आक्षेप कमी होऊन सेवाजेष्ठतेनुसार सर्व कर्मचाऱ्यांना समान न्यायाची हमी शक्य होईल अशी माहिती जनसंपर्क अधिकारी अभिजित भोसले यांनी दिली.

जिज्ञासापरिषद

विद्यार्थी निधी आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या वतीने नाशिक इथे कालपासून जिज्ञासा आंतरराष्ट्रीय परीषदेला प्रारंभ झाला. आरोग्य उपचार पद्धतीत जागतिक स्तरावर प्रगती होत असताना भारतीय पारंपरिक उपचार पद्धतीने कोरोना काळात चांगला आधार दिला आहे. त्यामुळे या उपचार पध्दतीला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, असं मत डीआरडीओचे अध्यक्ष डॉक्टर जी. सतीश रेड्डी यांनी यावेळी व्यक्त केलं.

कांदा-दरवाढ

नवी मुंबईतल्या मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत, कांद्याची आवक घटल्याने कांद्याच्या दरात पाच ते दहा रुपयांची वाढ झाली आहे. घाऊक बाजारात 15 ते 20 रुपये किलोने विकला जाणारा कांदा आता २५ ते ३० रुपये किलोने विकला जात आहे.

नागपूर

नागपूर जवळील हिंगणा तालुक्यातील धामण इथे फटाक्यांच्या कारखान्यात काल झालेल्या स्फोटात सहा जणांचा मृत्यू झाला आणि ४ जण जखमी झाले. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेबाबत शोक व्यक्त केला आहे.

दरड

रत्नागिरी जिल्ह्यातल्या अणुस्कुरा घाटात दरड कोसळल्यामुळे राजापूर कोल्हापूर मार्ग बंद झाला आहे. दरड हटवण्याचं काम सुरू असून इथली वाहतूक आंबा घाटमार्गे वळवण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दरम्यान, पावसाळ्यात दरड कोसळून रेल्वेमार्ग बंद होण्याची शक्यता लक्षात घेऊन मध्य रेल्वेनं कसारा आणि खंडाळा घाटात सुरक्षेच्या सर्व उपाययोजना केल्या असल्याचं रेल्वेनं पत्रकाद्वारे कळवलं आहे.

पुणे-भूस्खलनधोका

पुण्यासह सातारा, रायगड, रत्नागिरी आणि ठाणे जिल्ह्यातील ६३२ गावांना दरड पडण्याचा अथवा भूसख्खलनाचा धोका असल्याचा अहवाल भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण संस्थेनं राज्य सरकारला सादर केला आहे. यापैकी ५० गावं धोकादायक परिस्थितीमध्ये असल्याचं यात म्हटलं आहे. यातली सर्वाधिक म्हणजे ३१८ गावं रायगड जिल्ह्यातली आहेत.

पाऊस

सांगली जिल्ह्यात अग्रणी नदीच्या पाणलोट क्षेत्रात अतिवृष्टी झाल्यामुळं कवठेमहांकाळ तालुक्यात काही ठिकाणी पूल पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे मळणगाव ते बोरगाव आणि हिंगणगाव ते कवठेमहांकाळ रस्ते वाहतूक बंद करण्यात आली आहे.

हवामान

येत्या 24 तासात कोकण आणि विदर्भात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.